**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ११ विजय चंद्रपालजी गंगावने यांचा पुढील सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.ए. डेकाटे यांच्यामार्फत</u>**

**१५.** दि. १४.०३.२०२५ रोजी वाघाचे पोस्टमार्टम केले व सॅम्पल गोरेवाडा येथे पत्रासहित दि. १५.०३.२०२५ रोजी आर.एफ.ओ., खापा यांनी दिले. ते पत्र नि.क्र. १६ वर आहे. दि. २१.०३.२०२५ रोजी पोस्टमार्टम रिपोर्ट मिळाला. मला दि. १५.०५.२०२५ रोजी सी.ए. रिपोर्ट मिळाला. तो आधी गोरेवाडा येथे पाठवला होता. त्यानंतर आमच्याकडे आला. मला सदरचा सी.ए. रिपोर्ट दाखवण्यात आला. (आरोपीतर्फे वकीलांना सदरच्या रिपोर्टला निशाणी देण्याकरिता हरकत नसल्याने व भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३२८ प्रमाणे निशाणी देण्यात येते.) त्यास **निशाणी क्र. १०२** देण्यात येते. मला पोस्टमार्टम रिपोर्ट दाखवण्यात आला. (आरोपीतर्फे वकीलांना सदरच्या रिपोर्टला निशाणी देण्याकरिता हरकत नसल्याने निशाणी देण्यात येते.) पोस्टमार्टम रिपोर्टला **निशाणी क्र. १०३** देण्यात येते. मी आरोपींना ओळखतो. ते आज विडीओ कॉन्फरेंसिंगद्वारे हजर आहेत.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्रीमती. जे.एच.शेंडे यांच्यामार्फत</u>**

**१६.** हे म्हणणे खरे आहे की, सी.ए. रिपोर्ट प्रमाणे वाघाचा मृत्यू हा कुठल्याही केमिकलमुळे झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. १०३ प्रमाणे वाघाचा मृत्यू हा मल्टीपल ऑरगन फेल्यूअरमुळे झालेला आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, वाघाचा मृत्यू हा विषबाधामुळे झाला नाही. म्हणजेच करंट लागून झालेला आहे.

**प्रश्न -** वरील रिपोर्टप्रमाणे वाघाचा मृत्यू हा इलेक्ट्रीक शॉक लागून झालेला नाही हे बरोबर आहे काय ?

**उत्तर -** रिपोर्टमध्ये डॉक्टरने जे लिहिले आहे ते बरोबर आहे.

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपी पंढरी कुंभरे याचा पहिलांदा बयाण नि.क्र. ८० वर दि. १७.०३.२०२५ रोजी नोंदवला होता व दुसरा बयाण नि.क्र.९४ वर दि. २१.०३.२०२५ रोजी नोंदवला होता.

**प्रश्न -** नि.क्र. ९४ वरील दि. २१.०३.२०२५ मधील परिच्छेद क्र. ३ हा नि.क्र.८० वरील आरोपी पंढरी कुंभरे यांच्या बयाणात नाही हे बरोबर आहे काय ?

**उत्तर -** आरोपीने प्रत्येक वेळेस वेगवेगळा बयाण दिला आहे.

**१८.** हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ९० वर पंढरी कुंभरे याने परिच्छेद क्र. २ मध्ये १४ लाईनपासूनचा पूर्ण भाग बयाणात सांगितला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ ते ६ यांनी देखील तेच सांगितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाघाचे मिशा, दात व पंजे आरोपींकडून जप्त केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, चार टिममध्ये कोण लोक होती त्यांची नावे नमूद नाही. जप्त केलेल्या खुटयांना क्रमांक दिल्याचे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आकोडा जप्त केला नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, वायरचाच आकोडा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मृत वाघाचे फोटो दोषारोपपत्रात नाही. हे म्हणणे खरे आहे की, बोरीच्या लाकडाला लागलेले रक्त हे वाघाचे असल्याबाबत फॉरेंसिक रिपोर्ट दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, जप्त तारेचे बंडल, आरोपीचे जप्त कपडे, जर्मनचे घमेले व ५.५ मिटरचा बांबू यांना क्रमांक दिलेला नाही.

**प्रश्न -** आकोडा लावलेला बांबू न्यायालयात हजर केला नाही ?

**उत्तर -** केलेला आहे.

**१९.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपींच्या बयाणामध्ये त्यांनी वाघाची शिकार केली याबाबत उल्लेख केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींकडून डुक्कराचे मास जप्त केले नाही. आरोपींकडून पैसे जप्त केले की कसे हे मला आठवत नाही. सदर जंगलामध्ये किती

वाघ होते याचा अहवाल जोडायची मला गरज वाटली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी डुक्कराचे मास खाल्याने त्यांना वाघाची शिकार केल्याच्या गुन्हयात अडकवले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी गावातल्या डुक्कराचे मास खाल्ले आहे रानडुक्कराचे नाही. घटनास्थळावरील शेतांचे ७/१२ उतारे दोषारोपपत्रात जोडण्याची मला गरज वाटली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाघाचा मृत्यू विद्युत करंटमुळे झाला आहे हे पूर्ण दोषारोपपत्रात नमूद नाही.

**न्यायालयाची मध्यांतराची वेळ झाल्याने पुढील उलटतपास दुस-या सत्राकरिता तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.05.08 17:07:39 +0530

सावनेर,
दिनांक ०८.०५.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्रीमती. जे.एच.शेंडे यांच्यामार्फत शपथेवर सुरू.**

**प्रश्न –** नि.क्र.४० वरील मोक्का पंचनाम्यामधील परिच्छेद क्र. १ मध्ये वाघासारखा प्राणी असे लिहिलेले आहे, हे बरोबर आहे काय?

**उत्तर -** तिथे वाघच होता. पंचांनी जसे सांगितले आहे तसे लिहिले आहे.

**२०.** हे म्हणणे खरे नाही की, मी योग्य रीतीने तपास केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पूर्णपणे खोटी साक्ष दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, ५.५ मिटरचा बांबू घटनास्थळावरून जप्त केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दोन घटनास्थळ नमूद केले

आहे. हे म्हणणे खरे नाही की, दोन खुंटया घटनास्थळावरून व एक आरोपीच्या घरातून जप्त केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचा वाघाच्या मृत्यूशी संबंध नाही. वन अपराध तपशीलमध्ये अज्ञात आरोपी असे लिहिलेले आहे कारण आरोपी दि. १७.०३.२०२५ व दि. १९.०३.२०२५ रोजी निष्पन्न झाले. हे म्हणणे खरे नाही की, ५.५ मिटरच्या बांबूला आकोडा नव्हता. वाघ मेला तिथे वायर गेली होती व बाजूला विद्युत खांब होता. हे म्हणणे खरे नाही की, विद्युत खांबचा नंबर नमूद नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की सदर विद्युत खांबला क्रमांक नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, जप्त तार किती मिटर लांबीचे आहे ते नमूद केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास करून खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे व खरे आरोपी फरार आहे. हे म्हणणे खरे नाही की, डुक्कर मेला यावरून आरोपींनी वाघ मारला असे घोषीत करून खोटे दोषारोपपत्र तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, ५.५ मिटरचा बांबू डुक्कर मेला त्या ठिकाणचा आहे. मला नि.क्र. ८० वरील पंढरी कुंभरेचे बयाण दाखवण्यात आले. त्यामध्ये जप्त मोटर सायकल एम.एच. ३६६३ असे नमूद आहे. कारण आरोपीने तेवढाच नंबर सांगितला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.05.08 17:12:23 +0530

सावनेर,
दिनांक ०८.०५.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

सं.फौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार -वि- पंढरी
निशाणी क्र. ७८

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe